**ठळक बातम्या**

- दिशा सालियन मृत्यू प्रकरणाच्या चौकशीच्या मुद्द्यावरून आज राज्य विधानसभेत गदारोळ

- २०२४ या वर्षाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना जाहीर

- महाड परिसरात भीमसृष्टीची निर्मिती करण्याची सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांची घोषणा

- संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

**आणि**

- अमेरिकेत फेडरल रिझर्व्हच्या यंदाच्या दुसऱ्या पत धोरणात व्याजदर सव्वा चार ते साडे चार टक्के या श्रेणीत कायम

**<><><><><>**

दिशा सालियन मृत्यू प्रकरणाच्या चौकशीच्या मुद्द्यावरून आज महाराष्ट्र विधानसभेत गदारोळ होऊन कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब झालं. दिशाच्या मृत्यूच्या एसआयटी चौकशीचा अहवाल त्वरित सादर करावा आणि सामूहिक बलात्कार करून तिची हत्या झाल्याचे आरोप तिच्या वडिलांनी काल केले होते. त्यातल्या आरोपींची चौकशी करावी, गरज असेल तर त्यांना अटक करावी अशी मागणी आमदार अमित साटम यांनी केली. या प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करू, असं आश्वासन गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिलं. या प्रकरणी महाविकास आघाडी सरकारमधल्या मंत्र्यांसह आरोप झालेल्या व्यक्तींना अटक करावी अशी मागणी नितेश राणे आणि शंभूराज देसाई यांनी केली. त्यानंतर

सत्ताधारी सदस्यांनी अध्यक्ष समोरच्या जागेत येऊन घोषणाबाजी केल्यानंतर कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब झालं. तत्पूर्वी, दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सीबीआयकडून सखोल आणि निःपक्षपाती चौकशी व्हावी या मागणीसाठी आज शिवसेनेच्या आमदारांनी विधानभवन परिसरात फलक झळकावत मूक आंदोलन केलं.

**<><><><><>**

राज्यातल्या वाळू उपशाची परवानगी दिलेल्या सर्व ठिकाणांची विस्तृत पाहणी करून ज्या ठिकाणी परवानगी दिलेल्या हद्दीबाहेर जाऊन वाळू उपसा झाला आहे त्या ठिकाणी दंडासह वसुली केली जाईल असं आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिलं. प्रश्नोत्तराच्या तासात ते बोलत होते. वाळू क्रशरसाठी एक खिडकी योजना सुरू करून ३ दिवसांत परवानगी दिली जाईल असंही त्यांनी सांगितलं. सरकारने नवे वाळू धोरण तयार केलं आहे, लवकरच त्याची अंमलबजावणी सुरू होईल, त्यासाठी शिफारशी मागवल्या आहेत, असंही ते म्हणाले. किसन कथोरे, प्रशांत ठाकूर, प्रशांत बंब यासह अनेक सदस्यांनी यासंदर्भात प्रश्न विचारले होते. कराड इथल्या शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयातल्या आर्थिक गैरव्यवहार प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त होताच नियमानुसार कारवाई केली जाईल, असं उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानसभेत सांगितलं. प्रश्नोत्तराच्या तासात ते बोलत होते. गोहत्येचे गुन्हे वारंवार दाखल होणाऱ्या आरोपींवर मकोका लावण्याचे आदेश देऊ असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिले. संग्राम जगताप यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना त्यांनी हे आश्वासन दिलं.

**<><><><><>**

दिशा सालियन हिचं मृत्यू प्रकरण दाबण्यासाठी मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी दबाव आणल्याचा आरोप सालियन कुटुंबाने केला आहे. तसंच माजी मंत्री आदित्य ठाकरे, अभिनेता सुरज पांचोली यांच्यावर आरोप केले आहेत. त्यामुळे या प्रकरणी नव्याने चौकशी करावी, अशी मागणी भाजपाचे गटनेते प्रवीण दरेकर यांनी आज विधान परिषदेत केली.

दिशा सालियन प्रकरणात एसआयटीची स्थापना झाली आहे, सीआयडीने याप्रकरणी क्लोजर रिपोर्ट दिला आहे. पण सत्ताधारी पक्ष या प्रकरणाचा वापर राजकीय हेतूसाठी करत असल्याचा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. सभागृहाचं कामकाज नियमानुसार चालत नाही. विरोधकांना बोलण्यासाठी वेळ दिला जात नाही, असं दानवे म्हणाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अनिल परब यांनी सालियन प्रकरणात राजकारण होत असल्याचं सभागृहात सांगितलं. यावेळी परब आणि भाजपाच्या चित्रा वाघ यांच्यात शाब्दिक चकमक उडाली.

**<><><><><>**

विधानसभा आणि विधान परिषदेत सभापती आणि अध्यक्षांकडून कामकाजात एकांगी आणि पक्षपाती भूमिका घेतली जात आहे, अशी तक्रार विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. विरोधी पक्षांना आणि पक्षनेत्यांना सभापती आणि अध्यक्षांकडून पक्षपाती वागणूक मिळत आहे. सभागृहात विरोधी पक्षाच्या सदस्यांना बोलू न दिल्याने त्यांचा संवैधानिक हक्क डावलला जात आहे. त्यामुळे या प्रकरणात लक्ष घालून विरोधी पक्षांना न्याय मिळवून देण्याची विनंती दानवे यांनी राज्यपालांना केली आहे.

**<><><><><>**

२०२४ या वर्षाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना देण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत केली. २५ लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह, शाल असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

१०० वर्ष वयाचे राम सुतार यांनी अनेक महत्त्वाच्या व्यक्तींचे पुतळे आणि अनेक शिल्पं घडवली आहेत. केवडीया इथला स्टॅच्यू ऑफ युनिटी हा सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा, मुंबईत इंदू मिल इथल्या स्मारकातला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, सिंधुदुर्गात राजकोट इथला छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रस्तावित पुतळा यांचा त्यात समावेश आहे.

राम सुतार यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. सुतार यांना हा पुरस्कार मिळाल्याने पुरस्काराची प्रतिष्ठा उंचावली आहे असं शिंदे यांनी म्हटलं आहे. तर सुतार यांना हा पुरस्कार जाहीर होणं हे राज्यातल्या तेरा कोटी जनतेच्या त्यांच्यावरल्या निखळ प्रेमाचं प्रतीक आहे, अशा शब्दात पवार यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

महाड परिसरात भीमसृष्टीची निर्मिती करण्याची घोषणा सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आज केली. ते आज महाड इथं चौदार तळे सत्याग्रहाचा ९८ व्या वर्धापन दिन कार्यक्रमात बोलत होते. यासाठी लागणारा सर्व निधी उपलब्ध करून दिला जाईल, अशी ग्वाही देखील त्यांनी दिली. तर, चौदार तळे सुशोभीकरणासाठी यापूर्वीच घोषीत झालेल्या ७ कोटी रुपयांची, तसंच राजर्षी शाहू महाराजांच्या स्मारकाची तीन कोटी रुपयांची कामं तातडीनं सुरू केली जातील, अशी रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांनी घोषणा केली.

महाडमध्ये आज चौदार तळे सत्याग्रहाचा वर्धापन दिन लाखो भीम अनुयायांच्या उपस्थितीत सकाळपासूनच उत्साहात सुरू झाला. सकाळी साडेआठ वाजता चौदार तळ्याजवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासमोर रायगड पोलीस दलानं मानवंदना दिली. यावेळी हेलिकॉप्टर मधून चौदार तळे परिसरावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

**<><><><><>**

मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आज मुंबईत भेट घेतली. सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या या बैठकीत आरोग्य, शेती आणि पायाभूत सुविधांच्या उभारणीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कसा करता येईल यावर चर्चा झाली.

**<><><><><>**

नागपूरमध्ये गेल्या सोमवारी रात्री झालेल्या हिंसक घटनेच्या पार्श्वभूमीवर, दंगलग्रस्त भागात शांतता प्रस्थापित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी एक समिती गठीत केली आहे. ही समिती दंगलग्रस्त भागात जाऊन परिस्थितीची पाहणी करेल आणि नागरिकांशी संवाद साधेल. दरम्यान, नागपूरमध्ये सोमवारी घडलेल्या हिंसाचारानंतर ११ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत संचारबंदी लागू करण्यात आली होती. त्यापैकी कोतवाली, गणेशपेठ आणि तहसील पोलीस ठाण्यांच्या हद्दीत ही बंदी कायम राहणार असून अन्य ठिकाणी बंदी शिथिल करण्याचे आदेश पोलीस आयुक्त रविंद्र सिंघल यांनी दिले आहेत.

**<><><><><>**

लोकसभेत आज सरकारविरोधी घोषणा छापलेले कपडे घालून विरोधी पक्ष सदस्य सभागृहात आले होते. सभापती ओम बिरला यांनी त्याला हरकत घेतली. लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांच्या पुनरर्चनेला विरोध दर्शवणाऱ्या घोषणा छापलेले कपडे परिधान करुन द्रमुकचे सदस्य सभागृहात आले होते. त्यांनी सभागृहाबाहेर

जावं असं सभापतींनी सांगितलं, पण तसं न करता विरोधी पक्ष सदस्यांनी निषेधाच्या घोषणा दिल्या. गदारोळामुळे सभापतींनी कामकाज २ वाजेपर्यंत, आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब केलं.

राज्यसभेत अध्यक्ष जगदीप धनखड यांनी आधी एकदा १२ वाजेपर्यंत दुसऱ्यांदा २ वाजेपर्यंत, आणि नंतर दिवसभरासाठी कामकाज तहकूब केलं आणि सर्वपक्षीय खासदारांना आपल्या दालनात चर्चेसाठी बोलावलं.

**<><><><><>**

अमेरिकेची मध्यवर्ती बँक फेडरल रिझर्व्हनं आपला आधारभूत व्याजदर सव्वा चार ते साडे चार टक्के या श्रेणीत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. फेडरल रिझर्व्हनं २०२५ या वर्षासाठी अमेरिकेचा महागाईचा दर जास्त, तर आर्थिक विकास दर कमी राहील, असा अंदाजही वर्तवला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या आयात शुल्क वाढीच्या निर्णयानंतर उसळलेल्या जागतिक व्यापार युद्धाच्या पार्श्वभूमीवर फेडरल रिझर्व्हनं २०२५ या वर्षाचं दुसरं पतधोरण जाहीर केलं आहे.

**<><><><><>**

पारशी नववर्ष दिन जमशेदी नवरोज आज साजरा होत आहे. त्यानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. हे नवीन वर्ष सर्वांसाठी सुख, समृद्धी आणि आरोग्य घेऊन येवो, तसंच या वर्षात सद्भावनेचे बंध अधिक दृढ होवोत अशा शुभेच्छा त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

**//<><><><><>//**